**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## वऱ्हाडी बोलीभाषा ही मायबोली, तिचे संवर्धन करा - नरेंद्र इंगळे
## विद्यापीठात तिसऱ्या अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य सम्मेलनाचे उद्घाटन

अमरावती.

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील तफावत दूर केली पाहिजे, कारण बोलीभाषा ही मायबोली असून त्यातील शब्दांचा अर्थ मुलांना ठाऊक असला पाहिजे, बोलीभाषेबद्दल आपल्या मुलांमधील न्युनगंड दूर करण्याचे कर्तव्य पालकांनी करावे. वऱ्हाडी ही आपल्या सर्वांची मायबोली असून तिच्या संवर्धनासाठी वऱ्हाडी साहित्य सम्मेलन मैलाचा दगड ठरेल, असे मत जेष्ठ वऱ्हाडी साहित्यीक सम्मेलनाध्यक्ष नरेंद्र इंगळे यांनी व्यक्त केले. विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहात विद्यापीठाचा मराठी विभाग व अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने तिसरे अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य सम्मेलन आयोजित करण्यात आले, त्याचे उद्घाटन करतांना अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, सम्मेलन उद्घाटक तथा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. मधुकर वाकोडे, प्रमुख अतिथी तथा कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोलाचे सभापती शिरीषदादा धोत्रे, लेखिका सौ. अनुराधा धामोडे, मावळते सम्मेलनाध्यक्ष तथा दै. देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, पयले सम्मेलनाध्यक्ष तथा युवा वऱ्हाडी कादंबरीकार पुष्पराज गावंडे, अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाचे अध्यक्ष श्याम ठक, जेष्ठ सल्लागार प्रा. सदाशिव शेळके, निमंत्रक तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, डॉ. हेमंत खडके आदी उपस्थित होते.

श्री इंगळे म्हणाले, बोलीभाषेतील संवादामुळे माणूस जाणून घेण्याची ताकद कळते, काळजाची ती भाषा आहे. लोकगीतांसोबत वऱ्हाडी म्हणी चटका लावून जातात. एका वाक्यात माणसाचं अख्ख आयुष्य उभं करण्याची ताकद म्हणीत आहे. यावेळी त्यांनी वऱ्हाडी म्हणी सादर केल्यात. सकस साहित्य नेहमी मातीतून जन्म घेते, वऱ्हाडी बोलीभाषा शेतीमातीशी निगडीत असल्यामुळे ती काळ्या मातीशी नातं सांगणारी आहे. त्यामुळे काळी माती आणि पांढर सोनं ल्यालेली वऱ्हाडी बोली खरी धनवान आहे. ती सरकारी भाषेत मोडत नाही, विज्ञान आणि वाणिज्य शाखेत तिला मान्यता नाही. हे वास्तव आपण लक्षात घेता लोकभाषा आणि सरकारी भाषा हातात हात घेवून चालल्या पाहिजे. ग्रामीण साहित्य कृषि संस्कृतीशी संबंधित असल्यामुळे शेतकरी, कष्टकऱ्यांचा विचार व्हावा, असे सांगून वऱ्हाडी भाषेला दर्जा प्राप्त करुन देणाऱ्या अनेक मान्यवरांचा त्यांनी नामोल्लेख केला.

उद्घाटकीय भाषण करतांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मधुकर वाकोडे म्हणाले, महाराष्ट्रामध्ये वऱ्हाडी ही सर्वात समृद्ध भाषा आहे. गोविंदप्रभूंची, ज्ञानोबा, तुकोबा यांची सुद्धा भाषा वऱ्हाडीच असून ती भाषा सदैव कायम आहे व राहणार. भाषा व्यक्तिमत्व प्रगल्भ होण्यासाठी असते. भाषा एकमेकींच्या भगिनी असतात. वऱ्हाडीला कस्तुरीचा सुगंध, गोडवा असून येथील संतांनी वऱ्हाडी लोकभाषेतूनच किर्तनशैली विकसित केली. वऱ्हाडी भाषेचा जयजयकार करीत असतांना इतर भाषेचा सुद्धा सन्मान करा, असे सांगून त्यांनी सम्मेलनाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली.

स्वागताध्यक्ष कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, गाडगे बाबांचे किर्तन वऱ्हाडी भाषेत आहे. भाषा सर्वव्यापी असून भाषेतील गोडवा कायम ठेवण्यासाठी व वाढविण्यासाठी अशाप्रकारच्या सम्मेलनामुळे बळकटी प्राप्त होते. अमेरिकेत मराठीला चवथ्या भाषेचा दर्जा मिळाला असून आपल्याकडे मराठी भाषा संवर्धनासाठी पंधरवाडा आयोजित करावा लागतो, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात वऱ्हाडी भाषा जास्त बोलली जाते, हे बघता विद्यापीठात होत असलेल्या वऱ्हाडी साहित्य सम्मेलनाला वेगळे महत्व आहे. वऱ्हाडी बोलीभाषेचा संकोच आपल्या मनातून काढण्याचा आणि आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा, असेही कुलगुरू म्हणाले.

मावळते सम्मेलनाध्यक्ष दैनिक देशोन्नतीचे संपादक लोकनायक प्रकाश पोहरे यांनी मनोगतात सांगितले, ज्ञानाला कुठल्याच मर्यादा नसतात. भाषेमुळे ज्ञान समृद्धी होते. वऱ्हाडी भाषेचा सन्मान सर्वांनी करावा. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोलाचे सभापती तथा कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री शिरीषदादा धोत्रे यांनी सुद्धा यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचचे अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष श्याम ठक यांनी सम्मेलनाविषयी माहिती दिली. तर प्रास्ताविक भाषणातून आयोजनामागील भूमिका विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख तथा निमंत्रक डॉ. मोना चिमोटे यांनी मांडली.

सम्मेलनानिमित्त काढलेल्या ‘वानीचा हुळ्ळा’ विशेषंकाचे तसेच ‘रई’, ‘वऱ्हाडधन वऱ्हाडी शब्दकोष’, ‘सातबारा कोरा’, ‘जागर’ या पुस्तकाचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. जेष्ठ साहित्यीक देवकाताई देशमुख यांना जीवन गौरव पुरस्कार, तर वऱ्हाडरत्न पुरस्कार श्री महेंद्र राऊत व विलास सवई तसेच पुष्पराज गावंडे यलाई पुरस्कार उज्वल विभूते यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानचिन्ह, मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी नवनिर्वाचित सम्मेलनाध्यक्ष नरेंद्र इंगळे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ देवून मावळते सम्मेलनाध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी सत्कार केला व अध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली. पल्लवी नेमाडे हिने कुलगुरूंना त्यांचे स्वतःच्या हाताने तयार केलेले तैलचित्र प्रदान केले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. पुस्तक, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संचालन मराठी विभागातील डॉ. हेमंत खडके यांनी, तर आभार रविंद्र दळवी यांनी मानले. सम्मेलनाला कवी, कवियित्री, कथालेखक, साहित्यीक, वि. व ले. अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड, डॉ. मनोज तायडे, शैक्षणिक विभागप्रमुख, अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन जाधव तसेच डॉ. अलका गायकवाड, डॉ. वर्षा चिखले, प्रा. निता कांबळे, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. मीनाताई गावंडे, डॉ. अनुराधा वऱ्हाडे, मीराताई ठाकरे, किशोर मुगल, प्राचार्य डॉ.पी.आर. राजपूत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ०४/०१/२०२०.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी